2016-17


ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist.Nanded

VOL. 3
SPECIAL ISSUE 1
MARCH 2017

ISSN 2454-5503
Impact factor: 3.012 (IIJIF)

# CHRONICLE
## OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL



Special Issue on

## RELEVANCE OF GANDHIAN THOUGHTS IN PRESENT ERA

(Book I)

*Chief Editor*
**Dr. Shailaja Barure**

*Co Editor*
**Mr. Dhanaji Arya**

BY

GANDHIAN STUDIES CENTRE,
SHRI YOGESHWARI EDUCATION SOCIETY'S
SWAMI RAMANAND TEERTH MAHAVIDYALAYA,
AMBAJOGAI, DIST. BEED - 431517

**Dr. Anil Chidrawar**
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR

२४. महात्मा गांधी यांचे शैक्षणिक विचार / गादेकर पी.सी. / १२२
२५. महात्मा गांधी एक थोर समाज सुधारक : एक समाजशास्त्रीय आढावा / डॉ. दशरथ जाधव / १२६
२६. महात्मा गांधी आणि अस्पृश्यता निवारण / प्रा.डॉ.राम प्र.ताटे / १३२
२७. खादी आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग / केंद्रे मनिषा धनराज / १३७
२८. ग्रामीण विकासात म.गांधीचें योगदान / प्रा.डॉ. अशोक टिपरसे / १४०
२९. महात्मा गांधी आणि सत्याग्रह /जयपाल व्ही. घोगरे / १४३
३०. खादी- एक आर्थिक चक्र / सचिन गुंडीराम डेंगळे / १४८
३१. महात्मा गांधीची रचनात्मक कार्यक्रमाची संकल्पना / राजेंद्र हिरामण सूर्यवंशी / १५२
३२. महात्मा गांधीजींचे सामाजिक विचार / प्रा. सुनीता तु. चव्हाण / १५७
३३. महात्मा गांधीजींची ग्रामस्वराज्याची संकल्पना / प्रा. डॉ. आर. डी. शिंदे / पापा शिवाजीराव देशमुख / १६१
३४. महात्मा गांधीजींचे तत्वज्ञान / डॉ.सुचिता निवृत्तीराव किडीले / १६५
३५. महात्मा गांधीजी - अध्यात्मिक व वैज्ञानिक विचार / ॲड. प्रा. गीता सा. गिरवलकर(शर्मा) / १६९
३६. गांधीजी चे शैक्षणिक विचार / हेमराज वामनराव जाधव / १७३
३७. महात्मा गांधी आणि भारतीय स्त्री / प्रा.कातळे संगिता गुलाबराव / १७६
३८. महात्मा गांधीजींच्या विचारातील आर्थिक दृष्टीकोण / डॉ. पलमंटे माधव पांडूरंगराव / १८१
३९. महात्मा गांधी आणि ग्रामीण विकास / प्रा.फाजगे अंगद केशवराव / १८५
४०. म. गांधीजी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर / प्रा. कांबळे शिवाजी ई. / १८९
४१. छायावादी काव्य पर गांधी जी का प्रभाव / डॉ.वडचकर एस.ए / १९६
४२. महात्मा गांधीजींच्या अर्थकारणाचा शाश्वत विचार आणि वर्तमान / सागर शरद कुलकर्णी / २०१
४३. महात्मा गांधी आणि स्त्रीयांची शक्ती / अनुराधा ल.पाटील / २०७
४४. महात्मा गांधींची धर्मनिरपेक्षता / प्रा.ए.एस.फटांगरे / २१२
४५. महात्मा गांधीजींची ग्राम स्वराज्याची संकल्पा / प्रा.सुधाकर एस.हांगे / २१५
४६. महात्मा गांधी आणि ग्रामस्वराज्य/ प्रा.डॉ.विनोद विठ्ठल जाधव / २१९
४७. महात्मा गांधी व शेतकरी चळवळ/प्रा. डॉ. संजय खाडप / २२१
४८. महात्मा गांधीच्या आर्थिक विचारांची प्रासंगीकता / मेघा शरदचंद्र पाठक / २२४
४९. महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार / प्रा.डॉ.अंबादास पांडुरंग बर्वे / २२६
५०. महात्मा गांधी आणि ग्रामविकास / डॉ. स्मिता का. मरवाळीकर / २३२



56.

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

२८.

# ग्रामीण विकासात म.गांधीचे योगदान

प्रा.डॉ. अशोक टिपरसे
संशोधन मार्गदर्शक & अर्थशास्त्र विभागप्रमुख
देगलूर महाविद्यायल,देगलूर जि.नांदेड
९४२२५८०१२९

**प्रस्तावना :** २१ वे शतक हे भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय जडण, घडणीचे शतक आहे, असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. यासाठी अनेकांचे योगदान असून त्यात दादाभाई नौरोजी, न्यायमुर्ती म.गो. रानडे, गो.कृ.गोखले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी इ.विचारवंताचा या संदर्भात सक्रिय वाटा आहे. १९२० नंतर महात्मा गांधीनी ब्रिटीश सत्ते विरुध्द सत्याग्रह, आणि सविनय कायदे भंगासाठी सारखे नि:शस्त्र तंत्र हाती घेतले त्याचबरोबर दुसऱ्या बाजुला आर्थिक, स्वावलंबन, ग्रामीण कुटिरोद्योग, स्वदेशी वस्तुचा वापर इ. विधायक उपक्रमावर भर दिला. देशाची स्थिती सुधारण्यासाठी महात्मा गांधीनी आखलेली कृतीशील, ग्रामस्वराजय संकल्पना महत्वपुर्ण ठरते. महात्मा गंधीजीच्या विचारातील ग्राम स्वरुप संकल्पना मांडण्याचा प्रयत्न.

**उद्दिष्टये : (Objective)**

१. महात्मा गांधीच्या विचाराधारेत आर्थिक संकल्पना समजून घेणे.
२. आधुनिक काळात म. गांधीच्या विचारांची उपयोगिता तपासणे.
३. म.गांधीच्या विचारात ग्रामीण विकास अभ्यासणे.

**ग्रामीण विकसात म. गांधीजीचे विचार :** ग्रामीण विकास म्हणजे गरिबांच्या नैसर्गिक व मानवी संसाधनाचा अनुकूल उपयोग करुन त्यांच्या जीवनामानात सुधारणा करणे होय. सध्याच्या तंत्रज्ञानाच्या युगामध्ये समाज परिवर्तनाची गती वाढलेली आहे. यामध्ये नव्य गरजा, नव्या सोयी तसेच नवे सुख साधने निर्माण होत आहेत. गांधीजीचे ग्रामीण विकास म्हणजे भारतीय समाजाच्या गरजा भागविण्याचे एक अचार प्रधान तत्वज्ञान आहे. त्यात साध्या आणि साधने यांचा योग्य समन्वय साधला गेला आहे. हेच म.गांधीजीना ग्रामीण विकास म्हणजे सर्वाची उन्नती सर्वाचे कल्याण साधने हे ग्रामीण विकासाचे उद्दिष्टे आहेत. ग्रामीण विकासात सर्वाचे कल्याण, अभिप्रेत आहे. मं. गांधीजीची भौतिक विकासापेक्षा आधुनिक व नैतिक मुल्यांना प्राधान्य दिले आहे.

प्राचीन काळात भारतातील खेडी जशी स्वयंपुर्ण होती. अशी पुन: निर्माण करण्याची म.गांधीची ईच्छा होती. प्राचीन काळात भारतातील प्रत्येक खेडयात उत्पादन,



249

विभाजन व उपभोग या तिनही गोष्टी एकाच वेळी घडत असत. यासाठी कोणतेही खेडे हे दुसऱ्या खेडयावर अवलंबून नसायचे, गांधी नेहमी असे सांगत की, खरा भारत खेडयात पहायला मिळतो. भारतातील प्रत्येक खेडयाचा विकास झाला पाहिजे. त्यासाठी म.गांधीनी ग्राम विकासाची संकल्पना मांडली भारतातील गाव ही भारतातच वैभव होय. त्यामुळेच गाव ही भारतातच वैभव होच त्यामुळेच ग्रामीण भागाकडे चला हा मुलतंत्र त्यांनी दिला म. गांधीनी गामीण विकासासाठी तेरा कलमी कार्यक्रम सांगितला व या मधूनच भारतीय समाजातील समस्याचे निवारण होईल. आणि सांचे कल्याण होईल. असा त्याचा विश्वास होता. गांधीनी या कार्यक्रमाचा सतत पाठपुरावा केला आणि त्यासाठी विधायक कार्य होती घेतले.

**ग्रामीण विकास :** ग्रामीण भागातील विकासासाठी ग्रामपंचायतीलाच कार्य करावे लागतील ही कार्ये पुढीलप्रमाणे होत :

**ग्रामीण विकास :** म.गांधीनी अहिंसक दृष्टीचा विकास गरजेचा आहे. त्यामुळे ग्रामीण भागाचा विकास होईल अशा स्वरुपाची अहिंसेची मांडणी करुन त्याशिवाय औद्योगिक संस्कृती होऊ शकत नाही. तसेच स्वयंपुर्ण ग्रामची निर्मिती होणार नाही. ग्रामीण विकासात तिरस्कार द्वेष, मत्सर, शोषण हि हिंसेची साधने आहेत. भारतातील शेतकऱ्याच्या आत्महत्या जर थांबवायला असतील तर खेडयात कुटीर उद्योग निर्माण करणे. ही काळाची गरज आहे.

**ग्रामसुधार :** म.गांधीनी ग्रामसंख्या ही मजबूत असली पाहिजे गावातील लोकसंख्या जास्त असेल गावाना स्वावलंबनाच्या अनुषंगाने संघटीत केल्यास ते खूप काही करु शकतात. जेव्हा गावतील विकास पुर्णपणे होईल तेव्हा स्त्रि-पुरुष धर्म यांच्यात अंतर राहणार नाही. म्हणजेच गावातील लोक सुखी संपन्न राहतील. आज जी खेडी ओस पडली आहेत. ती पडणार नाहीत.

**ग्रामस्वच्छता :** पंचायतीने आपल्या गावातील स्वच्छता कशी राहील याकडे जातीने लक्ष दयावे गावात स्वच्छतेचे महत्व पटवून द्यावे विविध रोग निवारणासाठी खबरदारी घ्यावी निसर्गोपचारावर भर दयावा शरीर घर गंगण, गल्ली व गाव अशी स्वच्छता मोहिम राबवावी. ग्रामसफाईत प्रत्येकाने सहभाग घ्यावा. गावातील विहिर, नाली स्वच्छ करणे, स्वच्छ पाणी पुरवठा करणे, सांडपाण्याची व्यवस्था करणे.

**ग्रामपंचायत :** ग्रामपंचायत योजनेअंतर्गत राजकीय, आर्थिक व सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी गावातील व्यक्तीच कारभार पाहतील राजकीय विकेंद्रीकरण करुन ग्रामपंचायतीची स्थापना करावी गावातच सभाभवन असावे. पंचायतीच्या हाती कायदा न्याय, सत्ता व आधिकारअसतील ग्रामप्रशासन व चालविण्यासाठी गावातून पाच पंचाची निवड करावी. सर्व साधारण खटल्याचा निर्णय व न्यायनिवाडे याबाबत पंचायत निर्णय घेईल ग्रामसेवकांनी कोणत्याही निर्णय घेईल ग्रामसेवकांनी कोणत्याही



ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR

250

परिस्थितीत सत्य व अहिंसेचा अवलंब करावा ग्राम शांती व संरक्षणासाठी गावातील चमुने आळीपाळीने पहारा द्यावा त्यास शांती सैनिक किंवा ग्रामशांती दल असे म्हणावे जेणेकरुन गावात शांतता व सुव्यवस्था, प्रस्थापित राहिल.

**ग्रामोद्योगोविषयी विचार :** भारतातील खेडयाना स्वयंपूर्ण करण्यासाठीच गांधीजीनी ग्रामस्वराज्याची कल्पना मांडली होती. त्याच्या मते प्रत्येक खेडयात उत्पादन वितरण व उपभोग हया गोष्टी घडल्या पाहिजेत म्हणजेच प्रत्येक खेडे स्वयंपूर्ण असले पाहिजे. शेती हा खेडयातील लोकांचा मुख्य व्यवसाय परंतु येथील लोकांना बाराही महिने काम मिळत नसल्यामुळे त्यांना बेकारी व उपासमारी सारख्या समस्यांना तोंड दयावे लागते म्हणून ग्रामीण अर्थव्यवस्था स्वयंपुर्ण करण्यासाइी ग्रामोद्योगाच्या विकास झ ाला पाहिजे त्यामुळेच गांधीजीनी खादी व चरखा यालामहत्व दिल्याचे दिसून येते.

छोटेछोटे उद्योग नष्ट होऊ नये तर अटीवर त्यांनी मोठया उद्योगांना परवागी दिल्याचे आढळते. जी वस्तु शेजारच्या गावातून आणणे व त्यांचा मोबदल्यात आपली वस्तु त्यांना देणे या रंचनेचा मुख्य उद्येश म्हणजे एकमेकांच्या गरजा भागविणे हा होता.

**निष्कर्ष :** ग्रामीण विकास म्हणजे गरीबाच्या नैसर्गिक व मानवी संसाधनाचा अनुकूल उपयोग करुन घेणे होय. त्यांच्या जिवनस्तरात सुधारण करुन सध्याच्या तंत्रज्ञानाच्या युगामध्ये समाजपरिवर्तन घडवून आणणे. यामध्ये नव्या गरजा नव्या सोयी तसेच सुख साधने निर्माण होतात म. गांधीच्या मते ग्रामीण विकास म्हणजे सर्वाची उन्नती सर्वाचे कल्याण साथ देणे ग्रामीण विकसाचे उद्दिष्टे आहे. ग्रामीण विकासाच्या सर्वाचे कल्याण अभिप्रेत आहे. म.गांधी यांचे विचार परंपरेवर आधारीत असले तरी ते पुर्णपणे परंपरावादी नाहीत उत्तर परिवर्तनशील व प्रगतीवादी आहेत. गांधीजीची भौतिक विकासापेक्षा आधुनिक नैतिक मुल्यांना सर्वप्रथम स्थान दिले आहे. त्यांच्या विचारातून अर्थव्यवस्था राजकीय व्यवस्था आमचे शिक्षण, औद्योगिकरण,समाज व्यवस्था कुटूंबव्यवस्था जाती व वर्णव्यवस्था दलितांच्या समस्या नितिमत्ता इ.कितीतरी विषय आहेत.

**संदर्भ :**


१. लोकराज एप्रिल २०१२
२. सुमत यशवंत (२००७) गांधी विचाराचा विकास : काहि दिशा साधना, ११-१८ ऑगस्ट २००७
३. आर्थिक, विचाराचा इतिहास - प्रा. ए.आर. राचखेलकर
४. खंदारे एस.एम. (२०११) जागतिक आर्थिक, विचारांचा इतिहास, कैलाश प्रकाशन औरंगपुरा, औरंगाबाद.


□□□



Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

251